**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५/१८</u>**

**दशरथ विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर.**

## <u>आदेश नि.क्र. ५ खाली</u>

वादीने सदरचा अर्ज मौ. वडारवाडी ता. अहमदपूर येथील भू.क्र.१५६ मधील क्षेत्र ० हेक्टर ४४ आर प्रतिवादी क्र. ४ यानी भूसंपादीत जमीनीचा मावेजा उचलू नये व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी मावेजा वितरीत करू नये म्हणून तात्पूरता मनाई हुकूम मंजूर करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने कथन केले की, प्रस्तुतचा दावा मौ.वडारवाडी ता.अहमदपूर जि. लातूर येथील भू.क्र. १५६ क्षेत्र ४४ आर प्रतिवादी क्र. ४ यांचे नावे असलेल्या जमीनीस वादीची मालकी जाहीर करून कायम मनाईहुकूम मंजूर करण्यासाठी दाखल केलेला आहे.

३. वादीची मागणी, अर्जासोबतचे शपथपत्र व बहसचे अवलोकन केले असता, वादी एकतर्फा अंतरीम मनाईहुकूम देण्याइतपत प्रथमदर्शनी आपला अर्ज सिध्द करू शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे म्हणणे ऐकणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना वादीचा एकतर्फा अंतरीम मनाईहुकूमाचा अर्ज का मंजूर करू नये अशी नोटीस काढणे योग्य होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

### <u>आदेश</u>

१. वादीनी मागितलेला तुर्तातूर्त मनाई हुकूम का देण्यात येवू नये अशी कारणे दाखवा नोटीस प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना काढण्यात यावी.

२. प्रकरणाची तातडी पाहता नोटीस परतीची तारीख ०५/०३/२०१८ नेमण्यात येते.

दिनांकः१७/०२/२०१८

(जयदेव य.घुले)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.